**ठळक बातम्या**

- राज्यपालांच्या अभिभाषणानानं विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला सुरुवात

- शोकाकुल वातावरणात दोन्ही सभागृहात अजित पवार यांच्या आठवणींना उजाळा

- कृषीक्षेत्रात महिलांसाठी अनुकूल कर्ज उपलब्ध करुन देण्याची तज्ज्ञांची शिफारस

**आणि**

- राज्याच्या अनेक भागात अवकाळी पावसानं पीकांचं नुकसान, येत्या २ दिवसातही पावसाची शक्यता

**<><><><><>**

स्थूल राष्ट्रीय उत्पादनात महाराष्ट्राचं योगदान साडेतेरा टक्के असून देशात सर्वात जास्त परदेशी गुंतवणूक आकर्षित करणारं राज्यही महाराष्ट्रच असल्याचं प्रतिपादन राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी केलं आहे. राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या सुरुवातीला दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीत त्यांनी राज्य सरकारच्या कामगिरीचा आढावा मांडला. २०२५-२६ च्या पहिल्या तिमाहीत ९१ हजार ३२७ कोटींची गुंतवणूक राज्यात आली, त्यामुळे महाराष्ट्र हे उद्योगधंद्यात अग्रगण्य राज्य असल्याचं त्यांनी नमूद केलं. गेल्या महिन्यात दावोस इथं झालेल्या जागतिक परिषदेत राज्य सरकारनं विविध देशांमधल्या १८ कंपन्यांसोबत तीस लाख कोटी रुपयांचे करार केले, यामुळे ४० लाख रोजगार निर्माण होणार आहेत, असं राज्यपालांनी सांगितलं. उद्योगाला प्रोत्साहन देण्यासाठी राज्य सरकारनं आखलेल्या विविध धोरणांची माहिती यावेळी राज्यपालांनी दिली.

**- - होल्ड- बाईट राज्यपाल - -**

राज्यातल्या कृषी क्षेत्राच्या विकासालाही सरकारनं प्राधान्य दिलं आहे, त्यासाठी मागेल त्याला सौरपंप, मोफत वीज आदी योजना राबवल्या जात आहेत, असं राज्यपाल म्हणाले. महिला, आदिवासी, मागास समूहाच्या प्रगतीसाठी सरकार वचनबद्ध असल्याचं सांगत, या सर्व घटकांसाठी सरकार राबवत असलेल्या धोरणांची माहिती राज्यपालांनी दिली.

**<><><><><>**

दिवंगत उप मुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाबद्दल विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात आज शोकप्रस्ताव मांडण्यात आला.

अजित पवार यांच्या निधनाबद्दल शोकप्रस्ताव मांडणं हा आपल्यासाठी भावनिक क्षण आहे, त्यांच्यासारख्या सहकाऱ्याचं निधन होणं ही केवळ राजकीय हानी नाही तर व्यक्तिशः प्रचंड वेदनादायक बाब आहे, अशी भावना मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी विधानसभेत हा प्रस्ताव मांडताना व्यक्त केली. राज्याचं मुख्यमंत्रीपद सांभाळण्याची अजित पवार यांच्यात पूर्ण क्षमता होती असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

**होल्ड बाईट मुख्यमंत्री**

अजित पवार गेली दोन दशकं राज्याच्या केंद्रस्थानी होते, राज्याच्या राजकारणाचा इतिहास लिहिला जाईल तेव्हा त्यात अजित पवार यांचं नाव नक्की असेल असं राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जयंत पाटील म्हणाले.

लाखो लोकांचा पोशिंदा गेल्यावर ते लोक अनाथ होतात, तशीच स्थित अजित पवार यांच्या जाण्याने झाली आहे, अशा भावना व्यक्त करत उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अजित पवार यांना विधानपरिषदेत श्रद्धांजली वाहिली. यावेळी शिंदे यांनी अजित पवार यांच्या कठोर शिस्तीचा आणि कामाच्या झपाट्याचा आवर्जून उल्लेख केला.

**होल्ड बाईट शिंदे**

महाविकास आघाडीच्या स्थापनेवेळी अजित पवार यांच्या पक्षासोबत युती करू असं आपल्याला कधीही वाटलं नव्हतं, मात्र जेव्हा एकत्र आलो तेव्हा त्यांच्या कामाची पद्धत कळत गेली असं माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे म्हणाले. आपल्या मुख्यमंत्रीपदाच्या काळात अजित पवारांची आपल्याला भक्कम साथ मिळाली असं ठाकरे म्हणाले.

**होल्ड बाईट उद्धव**

**<><><><><>**

एआय ॲग्री २०२६ च्या परिषदेच्या दुसऱ्या दिवशी आज 'समतेसाठी कोडिंग - लिंगभाव संवेदनशील कृषी एआय परिसंस्थेसाठी धोरणात्मक उपाय' या विषयावर परिसंवाद झाला. महिलांना कृषी नवोपक्रमात समान भागीदार म्हणून मान्यता द्यायला हवी, 'शेतकरी' व्याख्येत महिलांचा समावेश करून महिलांसाठी अनुकूल कर्ज आणि विस्तार सेवा उपलब्ध करून द्यावी अशी शिफारस या परिसंवादात तज्ज्ञांनी केली. या सत्रात तंत्रज्ञान क्षेत्रात काम करणाऱ्या कोडरपासून ते धोरणकर्त्यांपर्यंत सर्वांनीच लिंगभाव तटस्थतेऐवजी लिंगभाव संवेदनशील दृष्टीकोन ठेवण्याचं आवाहन केलं.

**<><><><><>**

अनिल अंबानी रिलायन्स कम्युनिकेशन्स मर्यादित यांच्या बँक खात्यांना फ्रॉड म्हणून घोषित करण्यास एकल न्यायपीठाने दिलेली अंतरिम स्थगिती मुंबई उच्च न्यायालयाने आज उठवली.  डिसेंबर 2025 मध्ये एकल न्यायपीठाने या कर्जखात्यांना दिलेली  स्थगिती ही  बेकायदा आणि विपर्यस्त असल्याची टिप्पणीही मुंबई उच्च न्यायालयानं केली आहे. या स्थगितीविरोधात तीन सार्वजनिक बँकांनी न्यायालयात अपील केलं होतं.

**<><><><><>**

जालना जिल्ह्यात बालकामगार विरोधी पथकाने शहरातल्या विविध आस्थापनांवर टाकलेल्या छाप्यांमधून ५ बालकामगारांची सुटका करण्यात आली. या प्रकरणी एकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यात एका १४ वर्षांखालच्या मुलाचा आणि चार किशोरवयीन मुलांचा समावेश आहे.

<><><><><>

आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक महानगरपालिकेने पहिल्या हरित महानगरपालिका कर्जरोख्यांची घोषणा आज केली. दोनशे कोटी रुपयांच्या कर्जरोख्यांचं दर्शनी मूल्य प्रत्येकी एक हजार रुपये आहे. रोखे विक्री येत्या बुधवारी २५ फेब्रुवारी रोजी खुली होईल तर येत्या २ मार्च रोजी बंद होईल. या रोख्यांवर दरसाल ८ पूर्णांक २ दशांश टक्के दराने परतावा मिळेल. या निधीचा वापर जलवाहिनी बांधकाम आणि विस्तार, साधुग्राम आणि नीलगिरी बाग जलशुद्धिकरणाचं बांधकाम याकरता होणार आहे.

<><><><><>

रत्नागिरी जिल्ह्यात वनविभागाने आयोजित केलेल्या पहिल्या पक्षीमित्र संमेलनात ग्रेट हॉर्नबिल अर्थात महाधनेश या पक्षाला जिल्हा पक्षी म्हणून घोषित करण्यात आलं. या संमेलनात राज्यभरातले पक्षीमित्र सहभागी झाले होते. या संमेलनात टपाल तिकिटांचं प्रदर्शन, गिधाड संवर्धनाचा प्रभावी संदेश देणारं कल्चर्ड व्हल्चर हे संगीत नाटक, तसंच प्रत्यक्ष पक्षिनिरीक्षण अशा विविध कार्यक्रमांचा समावेश होता.

<><><><><>

नाशिक महापालिकेच्या स्थायी समिती सभापतीपदासाठी भाजपकडून मच्छिंद्र सानप यांना उमेदवारी देण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसने मुकेश शहाणे यांना उमेदवारी दिली असून या दोन्ही उमेदवारांनी आपला अर्ज आज दाखल केला. महापालिकेच्या स्थायी समितीत १६ पैकी ९ सदस्य भाजपचे आहेत. मात्र,

भाजपला पाठिंबा देणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेसनेही या उमेदवारीवर दावा केला आहे. येत्या बुधवारी स्थायी समिती सभापतीपदाची निवडणूक होणार आहे.

**<><><><>**

टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या सुपर एटमधे आज मुंबईत वानखेडे स्टेडीयमवर झिंबाब्वे आणि वेस्ट इंडीज यांच्यात सामना होत आहे. झिंबाब्वेनं नाणेफेक प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

**<><><><>**

**सोलापूर** शहर तसंच जिल्ह्यात काही भागात  काल संध्याकाळी अवकाळी पाऊस झाला. सकाळपासून वातावरण ढगाळ आहे तर बार्शी करमाळा भागात पावसाच्या हलक्या सरी कोसळल्या.

**लातूर**मध्येही उदगीर जळकोट निलंगा या भागांमध्ये रात्री पाऊस झाला. पावसामुळे काढणीला आलेल्या धान्यपिकांसह फळबागांचही नुकसान झालं आहे.

**यवतमाळ**च्या राळेगाव, महागाव तालुक्यांमध्ये  अवकाळी पावसासह जोरदार गारपीट झाली. पिकांसोबतच  सोसाट्याच्या वाऱ्यामुळे  घरांचेही नुकसान झाले आहे.

**सिंधुदुर्ग** जिल्ह्यात फोंडाघाट परिसरात काल संध्याकाळी पाऊस झाला. गेले काही दिवस धुकं आणि ढगाळ हवामान आहे.

**<><><><>**

गेल्या २४ तासात मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडला. कोकण आणि मध्य महाराष्ट्रात हवामान कोरडं होतं.

येत्या दोन दिवसात मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. कोकण आणि मध्य महाराष्ट्रात हवामान कोरडं राहील.

**//<><><><>//**